N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S.(ठाणे):** रामदासपेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0265 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/06/2023 15:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 12/01/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/01/2023
**Time From (वेळेपासून):** 17:35 वजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:00 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 30/06/2023 **Time (वेळ):** 15:23 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 019
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/06/2023 15:23 वजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय अकोला

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.मंगेष प्रितम इंगळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दिग्रस खुर्द ता पातूर ,जि अकोला ,रामदासपेठ,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दिग्रस खुर्द ता पातूर ,जि अकोला ,रामदासपेठ,अकोला,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नासीर खान मुनाफ खान | | | 1. गुलशन कॉलनी, लकडगंज चौक,हुसेनी शॉपचे बाजुला अकोला,रामदासपेठ,अकोला, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

फिर्यादिने आज रोजी फिर्याद दिल्याने त्वरीत दाखल

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकिकत- नक्कल फिर्याद माझे नाव - श्री.मंगेश प्रितम इंगळे वय 36 वर्ष व्यवसाय शेती रा.दिग्रस खुर्द ता.पातूर जि. अकोला

मो.न.9588662360, 9921270606,मी वरील प्रमाणे असुन दिनांक 11/01/2023 रोजी मा.अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. अमरावती परीक्षेत्र,अमरावती यांना फोन करून सांगीतले की, माझी एका लोकसेवका विरूदध तक्रार असून मी दिग्रस खुर्द ता.पातुर जि.अकोला येथून अमरावती येथे येवू शकत नाही.तरी आपण पुढील कार्यवाही करीता आपला स्टाफ अकोला येथे पाठवीणेबाबत विनंती केली.त्यावरून दि. 12/01/2023 रोजी पोनि योगेशकुमार दंदे, पंच व अमरावती ला.प्र.वि चा स्टाफ असे अकोला येथे आले तेव्हा त्यांनी मला मोबाईल फोन करून रेल्वे स्टेशन अकोला येथील मागील पार्कींग येथे बोलावुन घेतल्याने मी माझ्या दुचाकी वाहनासह तेथे आलो. तेव्हा पोनि योगेशकुमार दंदे, यांनी पंचासमक्ष माझे नाव गाव विचारून लोकसेवका विरूदध असलेल्या तक्रार संबधाने विचारपुस केली असता मी त्यांना सांगीतले की, मी माझे पत्नीचे नावे मौजे कौलखेड येथील शेत सर्वे नं.6/7/5 मधील प्लॉट क्र.34अ क्षेत्रफळ 968.40 चै.फुट हा नानक रामचंद्र मंगतानी रा.अकोला यांचेकडून दि. 15/12/2022 रोजी स्वतः खरेदी केलेला आहे. त्याची रितसर खरेदी केलेली आहे. सदर प्लॉटचे मुळ मालकाने महानगरपालीका अकोला येथून सबडिव्हीजन करुन घेतलेले होते व सबडिव्हीजनची नोंद सातबा-यावर होणेकरीता नानक मंगतानी यांनी मा.तहसिलदार अकोला यांचेकडे दि.19/10/2022 रोजी अर्ज केलेला आहे. सदर प्लॉटची खरेदी माझे पत्नीच्या नावे झाली असल्याने सातबा-यावर सबडिव्हीजनची नोंद तुम्ही स्वतः करुन घ्या, असे मला मुळ मालक श्री.मंगतानी यांनी सांगीतले होते. सदरची नोंद घेण्याकरीता मी मागील आठवडयात मा.तहसिलदार सुनिल पाटील साहेब यांना भेटलो असता त्यांनी मला सांगीतले की, तुमच्या केस मध्ये भरपुर त्रुटया आहेत, त्यामुळे तुम्ही खान बाबुला भेटून घ्या,असे सांगीतले. परंतु त्या दिवशी खान बाबुची भेट झाली नाही. त्यानंतर मी दि. 11/01/2023 रोजी तहसिल कार्यालय अकोला येथील खान बाबू यांना भेटलो असता त्यांनी मला म्हटले की, तुम्ही तहसिलदार साहेबांना भेटून आले, परंतु पैशाबददल काहीही बोलले नाही.त्यामुळे त्यांनी तुम्हाला माझेकडे पाठविले आहे. मी तहसिलदार साहेबांशी तुमचे कामाच्या संबंधाने पैशांबाबत बोलुन घेतो. तुम्ही उदया दि. 12/01/2023 रोजी दुपारी 03.00 वा.नंतर या,असे म्हटले. त्यानंतर मी तिथून निघून आलो. मला ते उदया लाचेची मागणी करणार आहेत. तरी मला मा.तहसिलदार सुनिल पाटील साहेब व खान बाबू यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही तसेच माझा व त्यांचा कुठलाच देवाण-घेवाणीचा व्यवहार नाही. तरी त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. अशा आशयाची तोंडी तक्रार सांगीतली. व त्याच वेळी लेखी तक्रार लिहुन दिली. त्यावर पंच क्र. 1. मुकुंद बोडखे यांनी शेरा लिहुन पंचांनी त्या तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन पोनि दंदे यांनी सुध्दा सही केली. त्यानंतर पोनि दंदे यांनी सांगितले की,मौजे कौलखेड येथील प्लॉटचे नियमानुकुलची (सबडिव्हीजनची) नोंद सातबा-यावर होणेकरीता तहसिलदार श्री.सुनिल पाटील साहेब व लिपीक खान हे मला खरोखरच लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे? याची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगुन स्टाफ शैलेष कडू यांनी दोन्ही पंचांना व मला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बददल माहीती व कार्यपध्दती समजावुन सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यांनतर पोनि दंदे साहेब यांनी मला तहसिलदार श्री.सुनिल पाटील साहेब व लिपीक खान यांची भेट कशी होणार? याबाबत विचारणा केली असता मी त्यांना, तहसिलदार श्री.सुनिल पाटील साहेब व लिपीक खान हे सध्या तहसिल कार्यालयात हजर असतील असे सांगीतल्याने तहसिलदार श्री.सुनिल पाटील साहेब व लिपीक खान यांची भेट घेण्याकरीता मला पाठवुन पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यांनतर लगेच स्टाफ शैलेष कडू यांनी माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन मला व पंच क्र 1 श्री.मुकुंद बोडखे यांना माझ्या मोटरसायकलने तहसिलदार श्री.सुनिल पाटील साहेब व लिपीक खान यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय,अकोला येथे पाठविले तेव्हा माझी व लिपीक खान यांची भेट झाली भेटीदरम्यान लिपीक खान यांनी मला माझे पत्नीचे नावे असलेल्या मौजे कौलखेड येथील प्लॉटच्या नियमानुकुलची (सबडिव्हीजनची) नोंद होणेकरीता ''मी पाहून घेतो, साहेबांशी बोलून

घेतो, तो बोलो ना साहाब के'' असे म्हणून 8000/-व 2000/- रु. असे एकूण 10000/- रु ची मागणी करून सदर लाचेची रक्कम एटीएम वरुन पैसे काढून आल्यानंतर लगेच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच आमच्या कामाबददल व पैशांच्या मागणीबददल लिपीक खान हे माझ्याशी सविस्तर बोलेले आहेत.परंतु लिपीक खान यांनी सांगीतल्या प्रमाणे तहसिलदार श्री.सुनील पाटील साहेब हे मला लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे? याची पडताळणी करणे आवश्यक असल्याने तसेच तहसिलदार श्री.सुनिल पाटील साहेब हे हियरींगसाठी कलेक्टर ऑफीस अकोला येथे निघून गेल्याने त्यांची भेट न झाल्याने व रात्र झाल्यामुळे तहसिलदार श्री.सुनील पाटील यांची भेट केव्हा होईल? असे पोनि दंदे साहेब यांनी विचारले असता मी त्यांना उदया सकाळी 10 वा. नंतर तहसिल कार्यालयातच तहसिलदार साहेब यांची भेट होउ शकते,असे म्हटले. त्यावरून दि.13/01/2023 रोजी मी सांगीतले प्रमाणे तहसिल कार्यालय,अकोला येथील तहसिलदार श्री.सुनिल पाटील यांची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर दि.13/01/2023 रोजी सकाळी अंदाजे 11.30 वा च्या सुमारास पोनि दंदे साहेब हे सापळा पथकासह अकोला रेल्वेस्टेशन येथे आले तेव्हा त्यांनी फोन करून मला तेथे बोलावुन घेतल्याने मी माझ्या दुचाकी वाहनासह तेथे आलो. त्यांनतर पोनि दंदे साहेब यांचे सुचनेवरून अमंलदार शैलेष कडू यांनी माझ्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला व पंच क्र 1श्री.बोडखे यांना माझ्या मोटरसायकलने तहसिलदार श्री.सुनिल पाटील यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय, अकोला येथे पाठविले. तेव्हा माझी व तहसिलदार श्री.सुनिल पाटील यांची भेट झाली.भेटी दरम्यान तहसिलदार श्री.पाटील व माझ्यात माझे काम तसेच लिपीक खान यांच्या मागणी संबंधाने बोलणे झालेले आहे.त्यानंतर सापळा कार्यवाही करावयाची असल्याने तसेच मी अकोला ग्रामीण भागातील असल्यामुळे व जागा उपलब्ध नसल्याने पोनि दंदे साहेब यांनी शासकीय वाहनामध्ये सापळा पुर्व कार्यवाही करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि दंदे साहेब यांनी मला लाच रक्कम 10,000/-रू हजर करण्यास सांगीतले असता माझे कडे फक्त 8000/-रू असल्याचे पोनि दंदे साहेब यांना सांगुन 8,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक पोनि दंदे साहेब यांनी पंच क्र.2 यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.1यांना को-या कागदावर लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व पोनि दंदे साहेब यांनी सहया केल्या. त्यांनतर पोनि दंदे साहेब यांच्या सुचनेवरून नापोकॉं. विनोद कुंजाम यांनी मी हजर केलेल्या नोटांना ॲन्थ्रॉसीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली. त्यानंतर पोनि दंदे साहेब यांचे सुचनेवरून नापोकॉं. विनोद कुंजाम यांनी सापळा पुर्व कार्यवाही दरम्यान माझे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली 8,000/- रूपये लाच रक्कम खिशात असल्याची खात्री केली व पोकॉं शैलेष कडू यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझेजवळ देवून मला पंच क्र.1श्री.बोडखे यांचे सह माझ्या दुचाकी वाहनाने तहसिल कार्यालय,अकोला येथे रवाना केले. त्यानंतर आमच्या पाठोपाठ पोनि दंदे साहेब व सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे शासकीय वाहनाने रवाना होवुन दुर्गा चैक रोड चे कडेला आळीपाळीने उतरून पायदळ जाउन तहसिल कार्यालय, अकोला चे आजुबाजुला जाउन थांबले.तेव्हा मी व पंच क्रमांक 1 श्री.बोडखे तहसिल कार्यालय अकोला येथे गेलो असता पंच क्र.1 श्री.बोडखे यांना कॅबीनमध्ये जाणे शक्य नसल्याने ते कॅबीनचे बाहेर थांबुन राहीले व मी कॅबीनमध्ये गेलो तेथे काहीवेळ थांबल्यानंतर लिपीक खान कॅबिनचे बाहेर आले. परंतु त्यांना मधेच तहसिलदार श्री.पाटील हे भेटल्याने त्यांना पत्र टाईप करण्यास सांगितल्याने ते परत त्यांचे कॅबिनमध्ये जावुन काम करीत बसले असता मी त्यांचे कॅबिनचे बाहेर बराच वेळ उभे राहुन वाट पाहत थांबलो. परंतु लिपीक खान हे कामामध्ये व्यस्त असल्याने कॅबिनचे बाहेर आले नाही. कार्यालयाची वेळ संपत असल्यामुळे व अंधार पडत असल्यामुळे मी लिपीक खान यांचे कॅबिन मध्ये गेलो असता लिपीक खान यांच्यात व माझ्यामध्ये बोलणे झाले तेव्हा लिपीक खान हे कामामध्ये व्यस्त असल्याने त्यांनी मला म्हटले की,''मला साहेबाला विचारावे लागणार नंतर बघतो'' असे म्हटले. परंतु लाच रक्कम स्विकारण्या संबधाने सविस्तर बोलणी न झाल्याने लिपीक खान यांचे विरूध्द परत सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर दि.15/01/2023 रोजी मला माझे प्लॉटचे मुळ मालक श्री.नानक मंगतानी यांनी कॉल करुन, ''तुम कुछ मत करो, तुम्हारा काम हो गया''.असे सांगीतले. त्यानंतर मी तहसिल कार्यालय, अकोला येथे गेलो असता लिपीक खान हे त्यांचे जागेवर हजर नव्हते. तेथे असलेल्या दुस-या लिपीक यांना खान साहेबा बाबत विचारले असता त्यांनी मला सांगीतले की, ते सुटीवर आहे. त्यामुळे मी तेथून निघून आलो. त्यांनतर लिपीक खान यांची माहिती घेतली असता ते काही दिवस कार्यालयात आले नसल्याचे समजले. त्यानंतर मला माहिती मिळाली की, लिपीक खान यांनी माझे विरुध्द पोलीस स्टेशन रामदासपेठ अकोला येथे अप.क्र.41/2023 कलम 182, 419, 465, 468, 506 प्रमाणे तहसिल कार्यालयात असलेल्या कामाबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यावरून त्यांना माझेवर संशय आल्याने त्यांनी माझेवर खोटा गुन्हा दाखल केला असून ते आता माझ्याजवळून लाच रक्कम स्विकारणार नाही याची मला खात्री झाली. आजपावेतो मी माझे कामामध्ये व्यस्त असल्याने दिनांक 21/06/2023 रोजी पो.नि.श्री.दंदे साहेब यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथे भेटून

समक्ष निवेदन दिले.तरी दि.12/01/2023 रोजी मला माझे पत्नीचे नावे असलेला मौजे कौलखेड येथील प्लॉटची नियमानुकुल (सबडिव्हीजन) ची नोंद घेण्यासाठी तहसिल कार्यालय, अकोला येथील कनिष्ठ लिपीक नासीर खान मुनाफ खान यांनी तहसिलदार श्री.पाटील यांचे करीता 8,000/- रु. व स्वतःकरीता 2,000/-रु असे एकुण 10,000/-रु ची रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचा प्रयत्न केल्याने त्यांचेविरुध्द पुढील कायदेशिर कार्यवाही होणेकरीता माझी फिर्याद आहे.माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टंकलिखित केली असुन मी वाचुन पाहिली घडलेल्या घटनेनुसार बरोबर व खरी आहे सहि इंग्रजीत अस्पष्ट.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
JAGDISH PURUSHOTTAM INGLE
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): PBMH78575
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

FIR प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Manoj Ramsingh Bal
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
पो.स्टे., रामदासपेठ, अकोला
जि.अकोला